Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

**Jagdamba Education Society's**

# Santosh N. Darade Polytechnic

**At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401**

**Accredited by**
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

**Please Consider the Environment Before Printing…**

**Date: 29/07/2025**

## Activity Name: Day Special

## दिन विशेष

**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपल्या बातम्या, आतल्या बातम्या...
आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

# दिनविशेष

## व्यासंगी इतिहासकार बाबासाहेब पुरंदरे



बळवंत मोरेश्वर पुरंदरे ऊर्फ बाबासाहेब पुरंदरे हे मराठी साहित्यिक, नाटककार, इतिहासकार आणि वक्ते होते. बाबासाहेबांचा जन्म २९ जुलै १९२२ रोजी पुणे येथे झाला. बाबासाहेब पुरंदरे पुण्यात स्थायिक झाले आणि भारत इतिहास संशोधक मंडळ या संस्थेत काम करू लागले. या ठिकाणीच इतिहाससंशोधक खरे हे बाबासाहेबांना गुरू म्हणून लाभले. त्यानंतर इतिहास संशोधक म्हणून त्यांची वाटचाल सुरू झाली. बाबासाहेब पुरंदरे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांवर २०१५ सालापर्यंत १२ हजारांहून अधिक व्याख्याने दिली. बाबासाहेब पुरंदरे यांनी महाराष्ट्रातील गडकिल्ल्यांचा आणि मराठा साम्राज्य आणि शिवकालीन ऐतिहासिक दस्तऐवजांचा सखोल अभ्यास केला. भारताच्या स्वातंत्र्यानंतर पोर्तुगीजांच्या ताब्यातील भारताचा उर्वरित भाग परत मिळविण्यासाठी लढल्या गेलेल्या दादरा नगर हवेली मुक्ती संग्रामात बाबासाहेब पुरंदरे हे सुधीर फडके यांच्याबरोबर हिरिरीने सहभागी झाले होते.

बाबासाहेब पुरंदरे यांनी मुख्यत्वे ऐतिहासिक विषयांवर वर्णनात्मक लेखन, ललित कादंबरी लेखन तसेच नाट्यलेखन केले. 'जाणता राजा' या महानाट्याची निर्मिती केली. पुरंदऱ्यांची दौलत, पुरंदऱ्यांची नौबत, गड-किल्ल्यांची ऐतिहासिक माहिती देणारे साहित्य शेलारखिंड आणि राजा शिवछत्रपती हे बाबासाहेबांचे आजवर प्रकाशित झालेले साहित्य आहे. शिवचरित्र हे घरोघरी पोहोचावे हे ध्येय ठेवून बाबासाहेबांनी अथक संशोधनातून आणि परिश्रमांतून राजा शिवछत्रपती हा ग्रंथ साकार केला. बाबासाहेब पुरंदरे यांना महाराष्ट्र सरकारने २०१५ साली महाराष्ट्र भूषण हा सर्वोच्च पुरस्कारही दिला, तर २०१९ साली त्यांना पद्मविभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले. डी. वाय. पाटील यांच्या अभिमत विद्यापीठाने इतिहास संशोधनातील योगदानाबद्दल शरद पवार यांच्याच हस्ते त्यांना 'डी. लिट' ही सन्माननीय पदवी देऊन गौरविले होते. बाबासाहेब पुरंदरे यांचे १४ नोव्हेंबर २०२१ रोजी पुणे येथे निधन झाले.

Nashik Edition
Jul 29, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

Jagdamba Education Society's
SND POLYTECHNIC
KNOWLEDGE PERSPECTIVE UNDERSTNING

**LIBRARIAN**
**MR.U.D. MULANI**
**SND POLYTECHNIC**
**YEOLA-423401**

**PRINCIPAL**
**PROF.U.B JADHAV**
**SND POLYTECHNIC**
**YEOLA-423401**